Exh. 8

क्रि.कि.अर्ज नं. १/२०२६

**मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, जयसिंगपूर यांचे कोर्टात**

अजय अनिल कांबळे ) अर्जदार

विरुध्द

दिपक बाळू मोरे वगैरे ) जाबदार

यातील जाबदार नं. १ व २ तर्फे अर्जदार यांचे अर्जास म्हणणे खालीलप्रमाणे -

१) यातील अर्जदार यांचा अर्ज व अर्जातील संपूर्ण कथने धादांत खोटी, चुकीची व लबाडीची असल्याने ती यातील जाबदार यांना मान्य व कबुल नाही. जाबदार त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात.

Order
read and recorded

२) यातील अर्जदार यांचा अर्ज कायद्यातील तरतुदीप्रमाणे चालणेस पात्र नाही.

३) अर्जदार यांचे अर्ज कलम १ मधील यातील अर्जदार हे हरोली गावचे ............ इथपासून ............ विवाहाचे वेळी प्रत्यक्ष हजर होते इथपर्यंतचा मजकूर धादांत खोटा व लबाडीचा असून तो यातील जाबदार यांना मान्य व कबुल नाही. जाबदार नं. २ यांचा विवाह फसवून केला असून जाबदार नं. २ यांची जन्मतारीख कागदपत्राप्रमाणे ता. २/८/२००५ अशी असून अजय अनिल कांबळे, आकाश उल्हास पटवर्धन, संदीप पुंडलिक माने, सुरज शंकर उपाध्ये व ॲड. संतोष चव्हाण यांनी संगनमत करुन तिची मुळ जन्मतारीख २/८/२००५ अशी असताना ता. १/१/२००५ अशी आधारकार्डला खोटी नमुद करुन यातील अर्जदार यांनी तिचेकडून लग्नाकरीता पाच ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या रिंगा व १५ ग्रॅम वजनाचा सोन्याचा नेकलेस व रोख र.रु. ५०,०००/- अशा घेतलेल्या असून सदरचा विवाह हा जाबदार नं. २ यांना फसवून केलेला आहे. त्याबाबत यातील जाबदार यांनी मा. पोलिस निरिक्षकसो, शिरोळ पोलिस स्टेशन, शिरोळ, ता.जिल्हा पोलिस प्रमुखसो, कोल्हापूर यांचेकडे रितसर तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. सदरचा तक्रार अर्ज चौकशी करीता शिरोळ पोलिस स्टेशनकडे आलेला आहे. त्यामुळे सदर तक्रारीस बगल देण्याकरीता सदर अर्जाचा बनाव अर्जदार यांनी केलेला आहे.

PATIL MAYUR SAMPAT
Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2026.02.04 13:37:18 +0530

Assistant Superintendent

४) अर्ज कलम २ मधील संपूर्ण मजकूर धादांत खोटा व लबाडीचा असून तो यातील जाबदार यांना मान्य व कबुल नाही.

५) अर्ज कलम ३ मधील प्रस्तुतचा विवाह झालेनंतर ........ इथपासून ........ जाबदार नं. १ यांच्या घरी आजमितीस राहणेस आहेत इथपर्यंतचा मजकूर धादांत खोटा व लबाडीचा असून तो यातील जाबदार यांना मान्य व कबुल नाही.अर्जात नमुद केलेप्रमाणे अशी कोणतीही घटना घडलेली नव्हती व नाही. अर्जास पोषक व्हावे याकरीता अर्जदार यांनी सदर घटनेचा उल्लेख केलेला आहे. याउलट अर्जदार यांनी जाबदार यांना दि. १५/११/२०२५ रोजी ११.०० वा. अर्जदार यांना काहीतरी काम करा, घर खर्चासाठी पैसे नाहीत असे सांगत असताना अर्जदार यांनी काही काम करणार नाही, तुला काय करायच ते कर असे म्हणून जाबदार नं. २ यांना वाईटवंगाळ शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन पुन्हा मारण्याची धमकी दिलेबाबत शिरोळ पोलिस ठाणेकडील एन.सी.आर नं. ३८९/२०२५ दि. २८/११/२०२५ ने बी.एन.एस २०२३ चे कलम ११५ (२), ३५२,३५१ (२) प्रमाणे गुन्हा तोहमत असून अर्जदार यांनी कोणतीही घटना घडलेली नसताना याउलट जाबदार नं. २ यांना मारहाण करुन घराबाहेर काढलेले असून ती सध्या जाबदार नं. १ यांचे घरी आश्रीत म्हणून राहत आहे. तिला कोठेही बेकायदेशीर डांबून ठेवले नसून खोटी कारणे नमुद करुन सदरचा अर्ज अर्जदार यांनी दिलेला आहे.

६) अर्ज कलम ४ मधील संपूर्ण मजकूर धादांत खोटा व लबाडीचा असून तो यातील जाबदार यांना मान्य व कबुल नाही. अशी कोणतीही घटना घडलेली नव्हती व नाही.

७) अर्ज कलम ५ मधील संपूर्ण मजकूर धादांत खोटा व लबाडीचा असून तो यातील जाबदार यांना मान्य व कबुल नाही. अशी कोणतीही घटना घडलेली नव्हती व नाही. त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदार यांनी अर्जासोबत दिलेला नाही.

८) अर्ज कलम ६ मधील त्यानंतर अर्जदार हे घरी आले ........... इथपासून ............. अर्जदार हे त्यांचे घरी परत आले. इथपर्यंतचा संपूर्ण मजकूर धादांत खोटा व लबाडीचा असून तो यातील जाबदार यांना मान्य व कबुल नाही. याउलट यातील अर्जदार यांचे विरुध्द जाबदार यांनी तक्रार अर्ज दिलेला असून सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चौकशी चालू असल्यामुळे जाणीवपुर्वक राजकीय नेत्यांची नांवे घालून सदरचा अर्ज अर्जदार यांनी दिलेला आहे.

Assistant Superintendent

९) अर्ज कलम ७ मधील संपूर्ण मजकूर धादांत खोटा व लबाडीचा असून तो यातील जाबदार यांना मान्य व कबुल नाही. अर्जदार अर्जात कथन करतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नव्हती व नाही. याउलट जाबदार नं. २ ही अर्जदार याच्याकडून जिवीतास धोका निर्माण झालेने तिचे वडिलांचे घरी सुरक्षीत असून जाबदार यांना त्रास देणेकरीता सदर अर्जाचा बनाव अर्जदार यांनी केलेला आहे.

१०) अर्ज कलम ८ मधील संपूर्ण मजकूर धादांत खोटा व लबाडीचा असून तो यातील जाबदार यांना मान्य व कबुल नाही. यातील अर्जदार यांनी पत्नी नांदण्यास येण्याबाबत कोणतेही कोर्टात अथवा माहितगार वकिलांमार्फत आजतागायत नोटीस पाठविलेली नाही. तसेच अर्जदार हा अत्यंत घातकी स्वरुपाचा असून त्याची हरोली या भागात दहशत आहे. तसेच त्याला दारुचे व्यसन असून अर्जास पोषक व्हावे याकरीता आत्महत्येचा प्रयत्न केलेबाबत नमुद केलेले आहे. मुळात तो वैद्यकिय व्यवसाय करीत असेल तर अशा प्रकारचा प्रयत्न करणे शक्य नाही.

११) अर्ज कलम ९ मधील संपूर्ण मजकूर धादांत खोटा व लबाडीचा असून तो यातील जाबदार यांना मान्य व कबुल नाही. असा कोणताही प्रकार घडलेला नव्हता व नाही.

१२) अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. घडले म्हणून नमुद केलेले कारण खोटे व लबाडीचे आहे.

१३) अर्जदार यांनी मागणी केलेली कोणतीही विनंती कायद्याने मिळणेस ते पात्र नसलेने ती नामंजूर करणेत यावी.

१४) यातील अर्जदार यांनी शिरोळ पोलिस स्टेशन यांना सदर कामी पक्षकार केले नसलेने सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही.

१५) सदरचा अर्ज हा बी.एन.एस.एस कलम १०० अन्वये चालणेस पात्र नाही.

१६) प्रस्तुत कामी यातील जाबदार नं. २ या अर्जदार यांनी मारहाण केल्याने त्यांचे माहेरी म्हणजेच जाबदार नं. १ यांचे घरी आश्रीत म्हणून राहत असून त्या आपले सुरक्षीत जीवन जगत आहेत. यावरुन तिचे व तिचे घरातील लोकांना अर्जदार यांचेकडून जिवीतास धोका निर्माण झाला आहे.

Assistant Superintendent

१७) सबब मे.कोर्टास विनंती की,

वरील कारणांचा विचार होवून यातील अर्जदार यांचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा ही नम्र विनंती.

येणेप्रमाणे म्हणणे असे.

ता. ४/२/२०२६

मे.जा.व्हावे.

Gdmore

**ऑफिडेव्हीट**

मी यातील वि.प नं. १ श्री. दिपक बाळू मोरे व.व.47, धंदा - शेती, रा. जांभळी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर आज मु. जयसिंगपूर सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो की, वरील म्हणणे मधील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट. ता. ४/२/२०२६

मी ॲफिडेव्हीट करणारेस
ओळखतो

ॲडव्होकेट

**प्रतिज्ञा**

मी यातील वि.प नं. १ अशी प्रतिज्ञा करतो की, वरील म्हणणेतील व ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकूर आमचे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.

ता. ४/२/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri. Deepak Balu More Age 47
of Jambhali Ta Shirol ...
identified by Shri. Adv S. S. Mhalungekar
...........whom I know person...
Dated :- 04/02/2026

Assistant Superintendent